जिल्हा परिषद अहमदनगर, शिक्षण विभाग (प्राथमिक)
दुरध्वनी क्रमांक - ०२४१-२३५३६९४
ई मेल आयडी - prathmik55@gmail.com
पत्ता- नविन प्रशासकीय इमारत, अहमदनगर पिन कोड - ४१४००१

नमुना-2

ग्राम:-गणेगाव दुरध्वनी:-9689682123 फॅक्स:- मोबाईल:-7745001000

युडायस क्रमांक -27260903402 ई-मेल cbseschoolganegaon@gmail.com

जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांचे कार्यालय, अहमदनगर,महाराष्ट्र.

जावक क्र.कार्या 4/आर.टी.इ./स्वमा /275/ 2023 दिनांक 31 /03/2023

व्यवस्थापक :- प्रसाद ग्रामीण शिक्षण संस्था,गणेगाव,ता.राहुरी,जि. अहमदनगर,महाराष्ट्र

विषय :- बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम,2009 यांच्या कलम 18 च्या प्रयोजनार्थ,बालकांना मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क नियम,2011 याच्या नियम 11,पोट नियम (4) अन्वये शाळांना मान्यता प्रमाणपत्र देण्याबाबत.

महोदय/महोदया,

आपल्या दिनांक 24/03/2023 च्या अर्जाच्या संदर्भात आणि त्यांनतर यासंदर्भात शाळेशी केलेला पत्रव्यवहार / शाळेची केलेली तपासणी या आधारे मी, भास्कर पाटील,शिक्षणाधिकारी (प्राथ), जिल्हा परिषद अहमदनगर दिनांक 01/04/2022 पासून दिनांक 31/03/2025 पर्यंत तीन वर्षाच्या कालावधीसाठी इयत्ता 01ली ते 12 वी करिता बाळासाहेब वाणी सेंट्रल स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, गणेगाव, ता. राहुरी, जि. अहमदनगर या शाळेस तात्पुरती मान्यता देत आहे.

1. मान्यता कालावधी वाढवून मिळणार नाही आणि इ.8 वी नंतर मान्यता किंवा संलग्नता देण्यास कोणत्याही परिस्थितीत कोणतेही बंधन नसेल.
2. बालकांना मोफत सक्तीच्या शिक्षणाचा अधिनियम 2009 (जोडपत्र एक) आणि महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम 2011 (जोडपत्र दोन) मधील तरतुदीचे शाळा पालन करीत.
3. शाळा नजिकच्या दुर्बल घटकातील आणि वंचित गटातील बालकांना पहिल्या इ.त्या इयत्तेतील विदयार्थी संख्येच्या किमान 25 टक्के मर्यादेपर्यंत प्रवेश देईल आणि प्राथमिक शिक्षण पुर्ण होईपर्यंत त्यांना मोफत व सक्तीचे शिक्षण देईल परंतु आणखी असे की,पुर्व प्राथमिक इयत्तांच्या बाबतीत देखील या प्रमाणकाचे अनुपालन करण्यात येईल.
4. परिच्छेद 3 मध्ये निर्दिष्ट केलेल्या बालकांकरिता शाळेला अधिनियमाच्या कलम 12 (2) नुसार प्रतिपूर्ती मिळेल अशी प्रतिपूर्ती मिळण्यासाठी शाळेला स्वतंत्र बँक खाते देण्यात येईल.
5. संस्था/शाळा कोणत्याही कॅपिटेशन फी वसुल करणार नाही आणि कोणत्याही छाननी पध्दतीसाठी बालकास किंवा त्यांच्या किंवा तिच्या माता-पित्यास किंवा पालकांस भाग पाडणार नाही.
6. कोणत्याही बालकांस वयाच्या पुराव्याच्या अभावी धर्म,जात किंवा वंश जन्म ठिकाण किंवा यापैकी कोणत्याही कारणास्तव व शाळेमध्ये प्रवेश नाकारण्यात येणार नाही.
7. (एक) शाळेत प्रवेश दिलेल्या कोणत्याही बालकांस तो कोणत्याही इयत्तेत असेल त्याच इयत्तेत रोखुन ठेवले जाणार नाही किंवा प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत शाळेतून काढून टाकण्यात येणार नाही.
   (दोन) कोणत्याही बालकांस शारीरिक शिक्षा किंवा मानसिक त्रास देणार नाही.
   (तीन) कोणत्याही बालकांस प्राथमिक शिक्षणपूर्ण होईपर्यंत कोणत्याही मंडळाची परीक्षा उत्तीर्ण होण आवश्यक असणार नाही.
   (चार) प्राथमिक शिक्षण पूर्ण केलेल्या प्रत्येक बालकास नियम 23 अन्वये निर्धारित केलेले प्रमाणपत्र देण्यात येईल.
   (पाच) विकलांग/विशेष गरजा असलेल्या विदयार्थ्यांचा अधिनियमाच्या तरतुदी नुसार समावेश करण्यात येईल.
   (सहा) अधिनियमाच्या कलम 23 (1) अन्वये निर्धारित केलेली मिन अर्हता धारण करणा-या शिक्षकांना अशी किमान अर्हता 5 वर्षाच्या कालावधीत संपादित करावी लागेल.
   (सात) अधिनियमाच्या कलम 24 (1) मध्ये विनिर्दिष्ट केलेली त्याची/तिची कर्तव्य शिक्षक पार पाडतील.
8. शाळा समुचित प्राधिकरणाने निर्धारित केलेल्या अभ्यासक्रमांच्या आधारे तयार केलेल्या पाठयक्रमाचे पालन करील.
9. शाळा अधिनियमाच्या कलम 19 मध्ये विहित केल्याप्रमाणे शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधाच्या तुलनेत विदयार्थ्यांना प्रवेश देईल.
10. शाळा अधिनियमाच्या कलम 19 मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मानकांचे व प्रमाणकांचे पालन करील.मागील तपासणीच्या वेळेत उपलब्ध असलेल्या सुविधा खालील प्रमाणे होत्या

| | |
|---|---|
| • शाळेच्या परिसराचे क्षेत्रफळ | 8,000 चौ.मी. |
| • एकूण बांधकाम क्षेत्र | 6,026 चौ.मी. |
| • खेळाच्या मैदानाचे क्षेत्रफळ | 5,400 चौ.मी. |
| • वर्गखोल्यांची संख्या | 35 |
| • कार्यालय-नि-भांडार-नि-मुख्याध्यापकांची खोली | 03 |

Secretary Principal
Shri Balasaheb Wani Central School
A/p. Ganegaon, Tal. Rahuri, Dist. A'nagar

Scanned with OKEN Scanner
Scanned with OKEN Scanner

- मुलांसाठी व मुलींसाठी स्वतंत्र प्रसाधनगृहे-जेथे वापरण्यासाठी व प्रसाधनगृहे स्वच्छ आणि आरोग्यदायी स्थितीत ठेवण्यासाठी पुरेसे पाणी असेल.- आहे
- पिण्याच्या पाण्याची सुविधा---- आहे
- दुपारचे जेवण शिजविण्यासाठी स्वयंपाकघर----- लागू नाही
- अध्यापन अध्ययन साहित्य/खेळ व क्रीडाविषयक सामग्री/ग्रंथालय यांची उपलब्धता------- आहे.
- वाचन साहित्य विनासायास उपलब्ध--------- आहे

11. मान्यता नसलेले वर्ग किंवा तुकडया शाळेच्या नावाने शाळेच्या परिसरात किंवा इतरत्र चालविता येणार नाहीत.
12. शाळेची इमारत किंवा इतर बांधकाम किंवा क्रिडांगण हे केवळ शिक्षणाच्या व कौशल्य विकासाच्या प्रयोजनार्थ वापरण्यात येतील.
13. शाळा,सोसायटी नोंदणी अधिनियम,1860(1860 चा 21 ) किंवा मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, 1950 अन्वये नोंदणी झालेल्या संस्थामार्फत चालविण्यात येत आहे.
14. शाळा कोणत्याही व्यक्तीच्या गटाच्या किंवा व्यक्तिसंघाच्या किंवा इतर कोणत्याही व्यक्तीच्या फायदयाकरिता किंवा कोणताही नफा मिळविण्यासाठी चालविण्यात येत नाही.
15. शाळेचे लेखे सनदी लेखापालाकडून लेखापरिक्षित व प्रमाणित करुन घ्यावेत आणि नियमांनुसार योग्य लेखा विविरणपत्रे तयार करावीत.प्रत्येक लेखा विविरणपत्राची एक प्रत दरवर्षी जिल्हा शिक्षणाधिकारी कडे पाठवण्यात यावी.
16. तुमच्या शाळेला मिळालेला मान्यता संकेतांक-

| 0 | 9 | | 1 | 1 | 2 | | 3 | 2 | | 0 | 0 | 9 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|

**09-112-32-009** असा आहे,हा या कार्यालयाशी कोणताही पत्रव्यवहार करताना कृपया तो नमूद करावा,याची नोंद घ्यावी.

17. शिक्षण संचालक/जिल्हा शिक्षणाधिकारी वेळोवेळी मागणी करतील असे अहवाल व माहिती शाळेने सादर करावी किंवा शाळेच्या मान्यतेच्या शर्तीची निरंतर पूर्तता करण्यासाठी किंवा शाळेच्या कामकाजातील त्रुटी दूर करण्यासाठी शासन किंवा स्थानिक प्राधिकरण देईल अशा सूचनांचे पालन करावे.
18. संस्थेच्या नोंदणीचे कोणतेही असल्यास नूतनीकरण केल्याची संनिश्चित करावी.
19. जोडपत्र (तीन) नुसार इतर शर्ती यासोबत जोडल्या आहेत.
20. संस्थेच्या मा.धर्मदाय आयुक्त यांचे कडील नोंदणीबाबत अपुर्तता,पदाधिकारी चेंज रिपोर्ट (बदल अहवालनुतनीकरण,लेखापरिक्षण इत्यादी संदर्भातील प्रकरणे प्रलंबित असल्यास सदर अहवालाची पुर्तता करुन घ्यावी व मा.धर्मदाय आयुक्त यांचेव्दारे मिळालेली परिशिष्ट 1 ची अदयावत प्रत शालेय दप्तरी जतन करुन ठेवावी.
21. संस्थेत वाद असल्यास मा.धर्मदाय आयुक्त,अहमदनगर यांचेव्दारे अंतीम निश्चित केलेल्या परिशिष्ट 1 मधील पदाधिकारी किंवा मा.धर्मदाय आयुक्त यांचेव्दारे सदर संस्थेच्या शाळेवर नेमलेल्या प्रशासकास देण्यात येईल.
22. शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या निर्णयांचे,परिपत्रकांचे,आदेशांचे व कार्यपध्दतीचे पालन करणे संस्था व शाळा दोहोंवर बंधनकारक राहील.
23. स्वंयअर्थसहाय्यीत तत्वावरील शाळेस महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियम अधिनियम 2012 (सन 2013 चा 01 ) मधील सर्व तरतुदींचे पालन बंधनकारक राहील.
24. शासनाकडून **बाळासाहेब वाणी सेंट्रल स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज,** या नावाने **इंग्रजी माध्यमासाठी गणेगाव, ता,राहुरी, जि.अहमदनगर** या ठिकाणी शाळा सुरु करण्यास परवानगी देण्यात आलेली आहे. भविष्यात माध्यम व ठिकाण यामध्ये कोणताही बदल करता येणार नाही.संस्थेने अथवा शाळेने त्यात कोणताही बदल केल्यास सदर मान्यता आपोआप रद्द होईल. तसेस या वदल दिनांकापासून सदर शाळा अनाधिकृत समजण्यात येईल.
25. सक्षम अधिका-याकडून सदर शाळेस युडायस क्रमांक प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी संबंधित संस्थेची राहील. तथापि शाळेमध्ये प्रविष्ठ झालेल्या प्रत्येक विदयार्थ्यांची माहिती सरल प्रणालीमध्ये समाविष्ट करणे,अदययावत करणे,आधार लिंकिंग करणे,विहीत मुदतीत व नमुन्यात युडायस प्रपत्र संबंधित अधिका-याकडे सादर करणे, प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र अंतर्गत आवश्यक ती सर्व कार्यवाही करणे इ.बाबतची जबाबदारी शाळेची राहील.

(भास्कर पाटील)
शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद अहमदनगर

Secretary Principal
Shri Balasaheb Wani Central School
A/p. Ganegaon, Tal. Rahuri, Dist. A'nagar

Scanned with OKEN Scanner